महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

पोलीस अधीक्षक, पालघर यांचे कार्यालय
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत संकुल, मोरेकुरण रोड, पालघर, बोईसर, रोड,
कोळगांव (प.) जिल्हा – पालघर. दुरध्वनी – ०२५२५-२५११००
E-mail sp.palghar@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा. क्र. पोअपा/आस्था-१/ पो. शि./ कागदपत्र पडताळणी उपस्थित/ १२८० /२०२३, दि :- १७ /०४/२०२३

# पोलीस अधीक्षक, पालघर पोलीस शिपाई भरती-२०२१

## तात्पुरती निवड यादीतील उमेदवारांचे मुळ कागदपत्र पडताळणी करीता उपस्थिती रहाणेबाबत उमेदवारांसाठी सुचना

दिनांक १७/०४/२०२३

---००---

पालघर जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवर पोलीस शिपाई संवर्गातील २११ रिक्त पदांकरीता आयोजित केलेल्या पोलीस शिपाई भरती -२०२१ ची मैदानी चाचणी व लेखी परीक्षा गुणांच्या आधारे गुणवत्ता यादी तयार करुन, उमेदवारांना मैदानी चाचणी व लेखी परीक्षेत मिळालेल्या गुणानुसार तात्पुरती निवड यादी (PROVISIONAL SELECTION LIST) व तात्पुरती प्रतिक्षा यादी (PROVISIONAL WAITING LIST) यादी उमेदवारांच्या माहिती करीता www. mahapolice. gov.in तसेच www.palgharpolice.gov.in या संकेतस्थळावर दि.१३/०४/२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

२. सदर तात्पुरत्या निवड यादीत (PROVISIONAL SELECTION LIST) यादीत समावेश असलेल्या उमेदवारांनी दि.२०/०४/२०२३ रोजी सकाळी १०.०० वा पोलीस अधीक्षक, पालघर या ठिकाणी उमेदवारांने त्यांचे आवेदन अर्जात नमूद केलेल्या खालील कागदपत्र / प्रमाणपत्र ची मुळ प्रत व त्यांच्या साक्षांकित केलेल्या प्रतींचे दोन संच तसेच ०२ पासपोर्ट साईजचे फोटोसह कागदपत्र पडताळणीसाठी न चुकता उपस्थित राहावे.

- शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र (माजी सैनिक यांचेकरीता आर्मी ग्रॅज्युएशन सर्टीफिकेट)
- जन्म तारखेबाबतचे प्रमाणपत्र (जन्म दाखला/शाळा सोडल्याचा दाखला/बोनाफाईड)
- अनु. जाती,अनु. जमाती, विजा-अ, भज-ब, भज-क, भज-ड, विमाप्र, इमाव या समाजिक प्रवर्गातुन अर्ज भरला असल्यास त्याबाबतचे जात प्रमाणपत्र व जात वैघता प्रमाणपत्र (असल्यास) तसेच नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र (अनु. जाती व जमाती प्रवर्ग वगळून) तसेच आर्थिक दृष्टया दुर्बल घटक प्रवर्गातुन आवेदन अर्ज सादर केला असल्यास ईडब्लुएस प्रमाणपत्र.
- अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)
- आवेदन अर्जात नमुद केलेले समांतर आरक्षणाबाबतचे (गृहरक्षक/प्रकल्पग्रस्त/भुकंपग्रस्त/ पोलीस पाल्य/अनाथ/खेळाडू/माजी सैनिक/युध्दात अपंग झालेल्या किंवा मृत झालेल्या सैन्यातील व्यक्तीचे

कुटुंबिय) प्रमाणपत्र/कागदपत्र तसेच महिला समांतर आरक्षणांतर्गत निवड झालेल्या महिला उमेदवारांनी मागासवर्गीय असल्यास (अनुसुचित जाती व जमाती वगळुन) नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र व खुला प्रवर्गातील महिला उमेदवारांनी उन्नत गटात मोडत नसलेबाबतचे महिला बाल विकास विभागाकडील “फ” प्रमाणपत्र.

- वाहन चालविण्याचा परवाना
- संगणक अर्हता प्रमाणपत्र
- NCC “ C ” प्रमाणपत्र

३. तात्पुरत्या निवड यादी (PROVISIONAL SELECTION LIST) मधील निवड ही भरती निकष पुर्ततेच्या अधीन असुन कागदपत्र पडताळणीस उमेदवार गैरहजर राहिल्यास त्यांचे नाव तात्पुरत्या निवड यादीतुन वगळण्यात येईल.

४. कागदपत्र पडताळणी पुर्ण झाल्यानंतर कागदपत्र पडताळणीमध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांची अंतिम निवड यादी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार प्रसिध्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी. याबाबत उमेदवारांचा कोणताही दावा /तक्रार/हक्क राहणार नाही याची नोंद घ्यावी.

५.पोलीस भरती प्रक्रिये दरम्यान नियमानुसार आवश्यक ते बदल/निर्णय घेण्याचे अधिकार पोलीस भरती निवड मंडळाकडे राखुन ठेवण्यात आलेले आहेत यांची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**(बाळासाहेब पाटील )**
**अध्यक्ष**
**पोलीस भरती निवड मंडळ तथा**
**पोलीस अधीक्षक,पालघर**